## निशाणी क्र. २१० वरील आदेश

सदरचा अर्ज अभियोग पक्षाने प्रस्तुत खटल्यातील आरोपी क्र. ९,१४,१५,१६,१७,२० आणि २१ यांना खटल्यातून वेगळे (Split) करून उर्वरित आरोपींविरूध्द् खटल्याचे कामकाज पुढे चालविणेसाठी दाखल केला आहे.

२. अभियोग पक्षाच्या म्हणण्यानुसार कुडाळ पोलीस ठाणे गु.र.क्र. ०९/२०१६ मधील उपरोक्त आरोपी यांचा सर्वोतोपरी तपास करून शोध घेवून ते मिळून न आल्याने त्यांना फरारी घोषित करण्याच्या अनुषंगाने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ७० व ८२ प्रमाणे आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया त्यांचेविरूध्द् पुर्ण करून न्यायालयात सविस्तर अहवाल सादर केला आहे. तसेच तपासीक अधिकारी श्री.एम.एम.काळडोके यांनी उपरोक्त नमुद आरोपींना वेगळे (Split) करून उर्वरित आरोपींविरूध्द् खटल्याचे चौकशीचे कामकाज सरकारपक्षास पुढे चालविणेबाबत मंजुरी मिळणेबाबतचा अहवाल सादर केलेला आहे. दि.१०/०१/२०१९ व दि. २४/०१/२०१९ रोजी दाखल केलेल्या अहवालातील उपरोक्त नमूद आरोपी यांना फरारी घोषित करण्याच्या अनुषंगाने त्यांचेविरूध्द् आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया पुर्ण करण्यात आल्याने आरोपी क्र. ९,१४,१५,१६,१७,२० आणि २१ यांना प्रस्तुत खटल्यातून वेगळे (Split) करून उर्वरित आरोपी क्र.१ ते ८, १० ते १२, १८, १९ आणि २२ ते २५ यांचेविरूध्द् खटल्याच्या चौकशीचे कामकाज पुढे चालविणेची त्यांनी विनंती केली आहे.

३. बचाव पक्षातर्फे सदर अर्जावर म्हणणे दाखल केले नाही.

४. अभियोग पक्षाचा व बचाव पक्षाचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले. अभियोग पक्षातर्फे सादर केलेले नि.क्र.२०३ आणि नि.क्र.२०९ चे अहवालांचे वाचन केले असता उपरोक्त

आरोपी क्र. ९,१४,१५,१६,१७,२० आणि २१ यांचे विरूध्द् प्रस्तुत प्रकरण वेगळे (Split) करून चालविणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व रास्त होईल असे वाटते. सदरचा खटला हा पाच वर्षे जुना असुन मा. उच्च न्यायालयाने निरीक्षण अहवालामध्ये अशी प्रकरणे लवकर निकाली काढणेचे आदेश दिले आहेत. सदर खटल्याचे लवकरात लवकर अंतिम निराकरण होणेसाठी आरोपी क्र. ९,१४,१५,१६,१७,२० आणि २१ यांचेविरूध्द्चा खटला वेगळा (Split) करून उर्वरित आरोपींविरूध्द् खटला पुढे चालविणे न्यायोचित होईल. सबब, अर्ज मंजूर करणे योग्य वाटते. परिणामी मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

## — <u>आदेश</u> —

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. आरोपी क्र. ९,१४,१५,१६,१७,२० आणि २१ यांचेविरूध्द्चा खटला वेगळा (Split) करणेचा आदेश करण्यात येतो आणि उर्वरित आरोपींविरूध्द् खटला पुढे चालविणे येतो.

सही/—
(पी.आर.कदम)
विशेष न्यायाधीश
सिंधुदुर्ग —ओरोस

दि.२५/०१/२०१९